संक्षिप्त

## विवेकानंद महाविद्यालयाकडून सायबर गुन्ह्यांसंदर्भात नागरिकांमध्ये जनजागृती

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमधील वाणिज्य विभाग, आयक्यूएसी व सायबर विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर गुन्हेगारी सुरक्षितता अभियान राबविण्यात आले. अभियानात सायबर गुन्हेगाराकडून नागरिकांची होणारी फसवणूक टाळण्यासाठी आवश्यक गोष्टी संदर्भात जनजागृती करण्यात आली. अभियानामार्फत कोल्हापूर, सांगली, सिंधुदुर्ग जिल्हे व शहरीभाग व २७गावांतील ग्रामपंचायत यांच्या सहकार्याने १,३५० पेक्षा जास्त कुटुंबांमध्ये जनजागृती करण्यात आली. प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील, आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. सनी काळे, सायबर पोलिस विभागाचे सागर माळवे, सुकुमार जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. अभियानाचे समन्वयक डॉ. उमेश दबडे यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

पुण्य नगरी
शुक्रवार, १० एप्रिल २०२६

# अर्पिता हावळचे स्पर्धा परीक्षेत यश

**कोल्हापूर :** आंबेवाडी (ता. करवीर) येथील अर्पिता सचिन हावळ हिची महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये कर सहायक व महसूल सहायक या पदांसाठी निवड झाली. अर्पिताचे प्राथमिक शिक्षण विद्यामंदिर आंबेवाडी येथे, तर माध्यमिक शिक्षण राजर्षी छत्रपती शाहू महाराज हायस्कूल, कोल्हापूर येथे झाले. तिने विवेकानंद महाविद्यालयात पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. कोणत्याही क्लासशिवाय तिने घरीच राहून अभ्यास केला. पहिल्याच प्रयत्नात तिने घवघवीत यश मिळवले.

